24 JUN 2022 पुण्यनगरी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'गोशिमा 'मध्ये 'फिनशिंग स्कूल लॅब 'चे उद्घाटन



लॅबचे उद्घाटन करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के व अन्य मान्यवर.

**गोकुळ शिरगाव : प्रतिनिधी**

येथील कोल्हापूर फौंड्री अँड इंजि. क्लस्टरच्या अंतर्गत गोशिमा सब क्लस्टरतर्फे 'सेंटर ऑफ एक्सलन्स'ची उभारणी करण्यात आली आहे. या लॅबचे उद्घाटन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते करण्यात आले. जिल्ह्यात प्रथमच प्रशिक्षण, कौशल्य विकास व अप-स्किलिंग या क्षेत्रात विविध प्रकारच्या सुविधा विकसित केल्या जात आहेत.

यावेळी उद्योजक सचिन शिरगावकर यांनी माहिती दिली. कोल्हापूर फौंड्री अँड इंजि. क्लस्टरचे कार्यकारी संचालक श्रीकांत दुधाणे, गोशिमाचे अध्यक्ष मोहन पंडितराव, उपाध्यक्ष दीपक चोरगे, मानद सचिव नितीनचंद्र दळवाई, खजिनदार स्वरूप कदम, संचालक अजित आजरी, सूरजितसिंग पवार, लक्ष्मीदास पटेल, राजीव परीख, जे. आर. मोटवाणी, सुनील शेळके, रणजित पाटील, प्रसाद गुळवणी, सल्लागार संचालक अरुण आराध्ये, निमंत्रित संचालक राजवर्धन जगदाळे, नचिकेत कुंभोजकर, शिवाजीराव सुतार, प्रशांत मेहता, कन्नूभाई पटेल, मंगेश पाटील, अमोल यादव, कोल्हापूर चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीजचे अध्यक्ष संजय शेटे, उपाध्यक्ष शिवाजीराव पवार, मॅकचे अध्यक्ष संजय पेंडसे, स्मॅकचे अध्यक्ष दीपक पाटील, उपाध्यक्ष एम. वाय. पाटील, संचालक राजू पाटील, सुरेंद्र जैन, कोल्हापूर इंजिनिअरिंग असोसिएशनचे अध्यक्ष हर्षद दलाल, उपाध्यक्ष दिनेश बुधले, सीआयआय अध्यक्ष रवी डोली, जिल्हा कौशल विकासचे सहायक आयुक्त संजय माळी, उद्योजक सोहन शिरगावकर, चंद्रशेखर डोली, प्रसाद मंत्री, विनय खोबरे, वसंत सुतार, प्रमोद पाटील, इंडस्ट्रीज इंटरॅक्शन सेलचे सागर डेळेकर, डॉ. ए. एम. गुरव, विश्वकर्मा इन्स्टिट्यूटच्या प्राचार्या डॉ. सुनीता दळवाई, ख्रिस्तीयानी शार्पलाईनचे मोहन अय्यर आदी उपस्थित होते. स्वागत व प्रास्ताविक योगेश कुलकर्णी यांनी केले. आभार रणजित मोरे यांनी मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

24 JUN 2022

पुढारी

# कबड्डीत प्रशिक्षकांचे योगदान महत्त्वाचे : कुलगुरू

## अ. भा. कबड्डी प्रशिक्षण शिबिरास प्रारंभ

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

कबड्डीत जागतिक पातळीवर भारताचे उच्चस्थान कायम राहण्यासाठी प्रशिक्षकांचे योगदान महत्त्वाचे आहे. किंबहुना, खेळाडूंबरोबरच त्यांना घडविणाऱ्या प्रशिक्षक व माजी आंतरराष्ट्रीय खेळाडूंनी यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करावेत, असे आवाहन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले.




**कोल्हापूर : जिल्हा कबड्डी असो. व रावज्‌ ॲकॅडमी आयोजित अ. भा. कबड्डी प्रशिक्षण शिबिरात मार्गदर्शन करताना शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. शेजारी प्राचार्य डॉ. व्ही. एम. पाटील, ई. प्रसाद राव, ॲड. आस्वाद पाटील, प्रा. संभाजी पाटील, अमरसिंह पाटील, डॉ. रमेश भेंडिगिरी. (छाया : पप्पू अत्तार)**

कोल्हापूर जिल्हा कबड्डी असोसिएशन, कबड्डी रावज ॲकॅडमी व न्यू कॉलेज यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित अखिल भारतीय कबड्डी प्रशिक्षण शिबिरास गुरुवारी प्रारंभ झाला. चारदिवसीय शिबिराचे उद्‌घाटन डॉ. डी. टी. शिर्के यांचे हस्ते आणि महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशनचे सरकार्यवाह ॲड. आस्वाद पाटील यांच्या अध्यक्षतेखाली झाले. यावेळी न्यू कॉलेजचे प्राचार्य डॉ. व्ही. एम. पाटील, कोल्हापूर जिल्हा कबड्डी संघटनेचे सचिव प्रा. संभाजी पाटील, शिरोळचे नगराध्यक्ष अमरसिंह पाटील, आंतरराष्ट्रीय खेळाडू उमा भेंडिगिरी, राज्य संघटनेच्या तांत्रिक समितीचे प्रमुख जे. जे. पाटील, शिवाजी विद्यापीठाचे क्रीडा विभागप्रमुख डॉ. पी. टी. गायकवाड यांच्यासह कबड्डी असोसिएशनचे पदाधिकारी उपस्थित होते.

राज्य कबड्डी संघटनेचे सरकार्यवाह ॲड. आस्वाद पाटील यांनी 'खेळाडूंमधील त्रुटी व शेवटच्या काही मिनिटांतील तणाव' हा मुख्य विषय घेऊन आयोजित केलेल्या या उपक्रमाचे विशेष कौतुक केले. क्रीडांगणावर दोन्ही संघांतील खेळाडूंनी गडी बाद केल्याबाबत शपथेची प्रथा बंद करावी, असे सूचक वक्तव्यही त्यांनी केले.

स्वागत आंतरराष्ट्रीय प्रशिक्षक डॉ. रमेश भेंडिगिरी यांनी, प्रास्ताविक आंतरराष्ट्रीय कबड्डी संघटनेचे तांत्रिक समितीप्रमुख ई. प्रसाद राव यांनी केले. आभार चंद्रशेखर शहा यांनी मानले.

24 JUN 2022

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# खेळाडूंचे विश्लेषण करा ; कबड्डीची गुणवत्ता वाढेल

## डॉ. डी. टी. शिर्के; प्रशिक्षकांचे तीन दिवसीय शिबिर सुरू, तज्ज्ञांकडून मार्गदर्शन

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. २३ : 'कबड्डी खेळाडूंतील सशक्त व अशक्त बाजूंचे विश्लेषण केल्यास त्यातून गुणवत्ता वाढविण्यासाठी पोषक वातावरण निर्माण होईल,' असे प्रतिपादन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी आज येथे केले.

कोल्हापूर जिल्हा कबड्डी असोसिएशन, न्यू कॉलेज व गोकुळ शिरगावमधील कबड्डी राव ॲकॅडमीतर्फे कबड्डी प्रशिक्षकांचे शिबिर सुरू झाले. त्याच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. कबड्डी राव ॲकॅडमीमध्ये कार्यक्रम झाला. दरम्यान, उद्यापासून (ता. २४) न्यू कॉलेजमध्ये सकाळी दहा वाजता चर्चासत्रास प्रारंभ होईल.

डॉ. शिर्के म्हणाले, 'जिल्ह्यातील कबड्डीपटू उत्कृष्ट कामगिरी करत असून, उत्तम प्रशिक्षक येथे उपलब्ध आहेत. कबड्डीसाठी जागतिक दर्जाच्या सुविधा उपलब्ध केल्या जात आहेत. भारताला आंतरराष्ट्रीयस्तरावर ओळख मिळावी, हा अजेंडा ठेवून इथले कबड्डी क्षेत्रातले जाणकार काम करत आहेत. क्रिकेटप्रमाणे कबड्डीत विश्लेषण होणे आवश्यक असून, त्यापद्धतीचे डेटा वाचन व्हायला हवे.' ते म्हणाले, 'विद्यापीठातील क्रीडा विभाग खेळाडूंना सुविधा उपलब्ध करण्यासाठी प्रयत्नशील आहे. विशेष म्हणजे इथल्या मुली सर्व क्रीडा प्रकारात बहारदार कामगिरी करताना दिसत आहेत.'

भारतीय कबड्डी संघाचे प्रशिक्षक ई. प्रसाद राव यांनी भारतीय कबड्डी संघाच्या वाटचालीसह विविध देशांत कबड्डीच्या होत असलेल्या प्रसारावर लक्ष वेधले. राज्य कबड्डी असोसिएशनचे सरकार्यवाह आस्वाद पाटील यांनी क्रीडांगणावर दोन्ही संघातील खेळाडूंनी गडी बाद केल्याबाबत शपथेची प्रथा बंद करावी, असे सांगितले. प्राचार्य डॉ. व्ही. ए. पाटील यांनी मनोगत व्यक्त केले.

या वेळी शिरोळचे नगराध्यक्ष अमर पाटील, आंतरराष्ट्रीय प्रशिक्षक डॉ. रमेश भेंडिगिरी, प्रा. संभाजी पाटील, उमा भोसले-भेंडिगिरी, डॉ. बाबासाहेब उलपे, अजित पाटील, चंद्रशेखर शहा उपस्थित होते.




**कोल्हापूर : जिल्हा कबड्डी असोसिएशन, न्यू कॉलेज आणि राव अकादमीतर्फे आयोजित कबड्डी प्रशिक्षक शिबिर गुरुवारपासून सुरू झाले. त्याच्या उद्घाटनप्रसंगी बोलताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. व्यासपीठावर ई. प्रसाद राव, प्राचार्य डॉ. व्ही. एम. पाटील, प्रा. संभाजी पाटील, आस्वाद पाटील, डॉ. रमेश भेंडीगिरी, उमा भोसले-भेंडीगिरी.** (मोहन मेस्त्री : सकाळ छायाचित्रसेवा)

2 4 JUN 2022
सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'एनसीसी'मुळे व्यक्ती मानसिकदृष्ट्या सक्षम : कुलगुरु शिर्के

कोल्हापूर, ता. २३ : राष्ट्रीय छात्रसेना ६ महाराष्ट्र मुलींचे पथकाचे वार्षिक प्रशिक्षण शिबिरात बक्षीस वितरण झाले. या वेळी 'एनसीसी'मुळे व्यक्ती मानसिकदृष्ट्या सक्षम राहते. त्याचा उपयाग आयुष्यातील पुढील ध्येय साध्य करण्यासाठी होतो. त्यासाठी प्रयत्नशील राहा.'' असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले. समादेशक अधिकारी कर्नल एस. गणपति उपस्थित होते. राष्ट्रीय छात्रसेना (एनसीसी) ६ महाराष्ट्र मुलींचे पथकाचे १० दिवसाचे वार्षिक प्रशिक्षण शिबीर झाले. शिबिरात ३०० महाविद्यालयीन मुली सहभागी झाल्या.

गटप्रमुख ब्रिगेडीअर समीर साळुंके, प्रशासकीय अधिकारी मेजर गुगामालती ए. सुभेदार मेजर सचिन पाटील, सुभेदार मेजर राजाराम वारंग, कॅप्टन एस.आर. शिंदे, लेफ्टनंट सुजाता पाटील, ऑफिसर एस. जे. जावीर, के. ए. फकीर आदी उपस्थित होते.

24 JUN 2022 लोकमत जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विधी अभ्यासक्रमाची परीक्षा 'ऑफलाईन एमसीक्यू' स्वरूपात

## शिवाजी विद्यापीठाचा निर्णय : विद्यार्थ्यांच्या लढ्याला यश

लोकमत न्यूज नेटवर्क,

**कोल्हापूर :** अभियांत्रिकी आणि विधी अभ्यासक्रमाच्या उन्हाळी सत्रातील परीक्षा ऑफलाईन एमसीक्यू (बहुपर्यायी प्रश्नावली) स्वरूपात होणार आहेत. त्याबाबतचा निर्णय शिवाजी विद्यापीठाने गुरुवारी जाहीर केला. विद्या परिषदेने या स्वरूपात परीक्षा घेण्यास मान्यता दिली आहे. या निर्णयामुळे गेल्या दोन महिन्यांपासून सुरू असलेल्या महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या लढ्याला यश मिळाले आहे. दरम्यान, कला, वाणिज्य, विज्ञान विद्या शाखांतील उर्वरित अभ्यासक्रमांची परीक्षा ऑफलाईन वर्णनात्मक स्वरूपात होणार आहे. अभियांत्रिकी, विधी अभ्यासक्रमाच्या परीक्षा ऑफलाईन (कोविडपूर्व) प्रत्यक्ष केंद्रावर विद्यार्थ्यांनी हजर राहून घेण्याचे विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाने जाहीर केले होते. मात्र, अभ्यासक्रम एमसीक्यू पद्धतीने शिकविण्यात आल्याने परीक्षाही ऑफलाईन एमसीक्यू स्वरूपात घेण्याची मागणी विद्यार्थ्यांनी केली. त्यासाठी गेल्या आठवड्यापासून विद्यार्थ्यांनी आंदोलनाच्या माध्यमातून जोरदार लढा दिला. त्याची दखल घेत विद्यापीठाने विद्यार्थ्यांची मागणी विद्या परिषद या अधिकार मंडळासमोर मांडली. त्यामध्ये अभियांत्रिकी, विधी अभ्यासक्रमाच्या परीक्षा ऑफलाईन एमसीक्यू स्वरूपात घेण्याचा निर्णय झाला. दरम्यान, सर्व पारंपरिक अभ्यासक्रमाच्या द्वितीय, तृतीय, चतुर्थ, पाचवे सत्र आणि पदव्युत्तर पातळीवरील भाग एक आणि दोन आदी अभ्यासक्रमाच्या परीक्षांचा प्रारंभ शनिवार (दि. २५)पासून होणार आहे.

### या अभ्यासक्रमांची परीक्षा अशी होणार

या दोन्ही अभ्यासक्रमांची परीक्षा ऑफलाईन पद्धतीने (प्रत्यक्ष परीक्षा केंद्रावर हजर राहून) ५० गुणांची संपूर्ण अभ्यासक्रमावर आधारित (प्रश्नपत्रिकेमध्ये एकूण २५ प्रश्न प्रत्येकी २ गुण) एक तास कालावधीची, एमसीक्यू पद्धतीने होणार आहे. त्यासाठी प्रश्नसंचिक, जादा वेळ, दोन पेपरमधील अंतर, आदींची मुभा असणार नाही. या परीक्षेचे सुधारित वेळापत्रक लवकर जाहीर केले जाणार आहे.

### आंदोलन सुरु राहणार

- विधी व अभियांत्रिकी शाखांबाबतच्या परीक्षेसंबंधी निर्णयाचे स्वागत आहे. पण, इतर व्यावसायिक, पारंपरिक कोर्सेसची देखील वस्तुनिष्ठ परीक्षा न घेणे हा दुजाभाव आहे.
- सोलापूर विद्यापीठाने सर्व कोर्ससाठी एमसीक्यू परीक्षेचा निर्णय घेतला आहे. या पद्धतीने शिवाजी विद्यापीठाने निर्णय घ्यावा, त्यासाठी आंदोलन चालू राहील, असे ऑल इंडिया युथ फेडरेशनचे राष्ट्रीय कौन्सिल मेंबर गिरीश फोंडे यांनी सांगितले.

> विधी, अभियांत्रिकी पदवी पातळीवरील अभ्यासक्रमांचे प्रवेश उशिरा झाल्याने त्या अभ्यासक्रमांच्या परीक्षा अद्याप सुरु झालेल्या नाहीत. त्याचा विचार करून आणि उच्च न्यायालयात दाखल केलेल्या रिट पिटीशनच्या निर्णयाच्या अधीन राहून विद्यापीठ अधिकार मंडळाच्या निर्णयानुसार परीक्षा ऑफलाईन एमसीक्यू पद्धतीने घेण्यात येणार आहे.
>
> - डॉ. अजितसिंह जाधव, संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ

24 JUN 2022 पुढारी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# न्यूज अँकरसाठी शुद्ध भाषेसह आकलन क्षमताही महत्त्वाची

## चेतन मिठारी, पल्लवी गोखले यांचे मत; विद्यापीठात न्यूज अँकर कार्यशाळा

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

न्यूज अँकर होण्यासाठी आवाज कमवावा लागतो. शुद्ध भाषा आणि स्पष्ट उच्चार हवेत. समयसुचकता व घटनांचे उत्तम आकलन असेल, तर चांगला न्यूज अँकर घडू शकतो, असे मत एस न्यूजचे प्रोग्राम कॉर्डिनेटर चेतन मिठारी व न्यूज अँकर पल्लवी गोखले यांनी व्यक्त केले.

शिवाजी विद्यापीठाच्या पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासन आणि तिटवे (ता. राधानगरी) येथील वीरपत्नी लक्ष्मी महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित एकदिवसीय न्यूज अँकर कार्यशाळेमध्ये ते बोलत होते.

वृत्तवाहिन्यांवर वृत्त देण्यासाठी स्पर्धा असली, तरी वृत्त निवेदकाने घाई करून चालत नाही. लोक व्यवहारातील प्रचलित शब्द व बोलीभाषेचा वापर करत बातमी अधिक सोपी करून सांगण्याची कला वृत्तनिवेदकाने अवगत केली पाहिजे. तटस्थपणे माहिती लोकांपर्यंत पोहोचविण्याचे कौशल्य वृत्तनिवेदकाकडे असायला हवे, असे मत त्यांनी व्यक्त केले.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात न्यूज अँकरिंग कार्यशाळेत मार्गदर्शन करताना एस न्यूजचे प्रोग्रामिंग कॉर्डिनेटर चेतन मिठारी, न्यूज अँकर पल्लवी गोखले. समोर कार्यशाळेत सहभागी विद्यार्थी. (छाया : नाज ट्रेनर)**

मिठारी व गोखले यांनी विद्यार्थ्यांकडून प्रात्यक्षिक करून घेतले. बातमी वाचायची कशी? आवाजातला चढ-उतार, प्रसंगावधान, कॅमेऱ्यासमोर नेमके बोलायचे कसे? आदी डेमो त्यांनी स्वतः करून दाखवला. विविध प्रकारच्या बातम्यांचे निवेदन करत असताना वृत्त निवेदकाच्या भावभावनांचे प्रतिबिंब निवेदकाच्या चेहऱ्यावर कशा पद्धतीने उमटते, याविषयीचे प्रात्यक्षिक त्यांनी केले. कॅमेऱ्यासमोर बोलताना घ्यावयाची दक्षता आणि पाळावयाचे संकेत, याबद्दल त्यांनी माहिती दिली. वृत्त निवेदकाची आसन व्यवस्था, लाईट, कॅमेरा अँगल यासह अन्य अनेक तपशील त्यांनी प्रत्यक्ष कृतीद्वारे विद्यार्थ्यांना समजावून सांगितले.

अध्यासनाचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव यांनी प्रास्ताविक केले. दिग्विजय कुंभार यांनी पाहुण्यांचे स्वागत केले. कार्यशाळेत पत्रकारिता विभागाच्या विद्यार्थ्यांबरोबरच अनेक पत्रकार, यू ट्यूबर्स, डिजिटल माध्यमातील पत्रकार उपस्थित होते.

पुण्यनगरी

# 'न्यूज अँकर' कार्यशाळेस प्रतिसाद

**कोल्हापूर :** समयसूचकता आणि घटनांचे उत्तम आकलन असेल तर चांगला न्यूज अँकर घडू शकतो, असे मत एस न्यूजचे प्रोग्रॅम कोऑर्डिनेटर चेतन मिठारी आणि न्यूज अँकर पल्लवी गोखले यांनी व्यक्त केले. शिवाजी विद्यापीठाच्या पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासन आणि तिटवे, ता. राधानगरी येथील वीरपत्नी लक्ष्मी महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित न्यूज अँकर कार्यशाळेत ते बोलत होते. अध्यासनाचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव यांनी प्रास्ताविक, तर दिग्विजय कुंभार यांनी स्वागत केले.

# योजनांचा लाभ घ्या ; स्वाभिमानाने जगा

## जिल्हाधिकारी राहुल रेखावार; तृतीयपंथीयांना कार्यशाळेत दिला विश्वास

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. २३ : समाजात सन्मानाने जगायचे असेल तर आत्मविश्वास बाळगा. कष्ट करून आत्मसन्मानाने व स्वाभिमानाने जगा, यासाठी प्रशासन निश्चितच सहकार्य करेल. तृतीयपंथीयांनी शासकीय योजनांच्या लाभासाठी स्वत:हून पुढाकार घ्या, असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल रेखावार यांनी आज येथे केले. कंत्राटी पद्धतीने नोकरी देण्यात येणाऱ्या तृतीयपंथी गौरी पोवार यांना जिल्हाधिकारी यांच्या हस्ते नियुक्तीपत्र दिले.

लोकराजा राजर्षी छत्रपती शाहू महाराज स्मृती शताब्दी कृतज्ञता पर्व अंतर्गत शिवाजी विद्यापीठाच्या भाषा भवन येथे तृतीयपंथी सर्वसमावेशक एक दिवसीय कार्यशाळेत जिल्हाधिकारी बोलत होते. सामाजिक न्याय व विशेष सहाय्यता विभागाच्या सहाय्यक आयुक्त समाजकल्याण कार्यालयाच्यावतीने कार्यशाळा झाली. तृतीयपंथीयांना सेल्फी घेत कार्यशाळेचा आनंद घेतला.

तृतीयपंथीयांची वैयक्तिक, शैक्षणिक, आर्थिक माहिती घेऊन त्यांना आवडीनुसार, क्षमतेनुसार कौशल्य शिक्षण दिले आहे. यापुढेही प्रशिक्षण कार्यशाळा घेऊन रोजगार उपलब्ध करून देता येईल. तृतीयपंथीयांना शासनाच्या विविध योजनांचा लाभ देण्यासाठी जिल्हा प्रशासन प्रयत्नशील आहे. कोणत्याही योजनेचा लाभ घेण्यासाठी त्यासाठी आवश्यक ती कागदपत्रे सादर करावीत असेही आवाहन जिल्हाधिकारी रेखावार यांनी केले.





**कोल्हापूर : तृतीयपंथी सर्वसमावेशक कार्यशाळा शिवाजी विद्यापीठातील भाषा भवन येथे गुरुवारी घेण्यात आली. यावेळी मार्गदर्शन करताना जिल्हाधिकारी राहुल रेखावार. शेजारी कार्यशाळेत सेल्फी घेताना तृतीयपंथी.**

तृतीयपंथीयाच्या हक्कांचे संरक्षण व कल्याण मंडळाच्या राज्यस्तरीय सदस्य श्रीगौरी सावंत म्हणाल्या, ''तृतीयपंथीयांच्या काही महत्वाच्या गरजा आहेत, त्या पूर्ण होण्यासाठी ते आक्रोशातून भावना व्यक्त करतत. जीवन जगताना पैसा ही प्रत्येकाची गरज आहे. तृतीयपंथीयांनी सक्षम होण्यासाठी अधिकाधिक योजनांची निर्मिती व्हायला हवी. तृतीयपंथीयांना समाजासोबत समाजातच रहायचं आहे, पण समाजाने सन्मानाची वागणूक द्यावी.''

मंडळाच्या राज्य व जिल्हा सदस्य ॲड. दिलशाद मुजावर यांनी समाजाच्या प्रगतीसाठी तृतीयपंथीयांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणणे गरजेचे आहे. तृतीयपंथीय समाजाच्या बदलाची सुरुवात जिल्ह्यात होत आहे, ही चांगली बाब असल्याचे सांगितले.

अतिरिक्त पोलिस अधीक्षक तिरुपती काकडे यांनी तृतीयपंथीयांनी रोजगाराचे परंपरागत साधन बदलून कौशल्य प्रशिक्षण घेवून व्यवसाय करावेत. यासाठी प्रशासन नेहमीच सोबत राहील,असा विश्वास दिला.

सहायक आयुक्त विशाल लोंढे यांनी प्रास्ताविक केले. यावेळी जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव प्रीतम कुमार पाटील, मयुरीताई आळवेकर, जिल्हा प्रतिनिधी अमृता सुतार तसेच तृतीयपंथी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सकाळ

# विधी, अभियांत्रिकी परीक्षा एमसीक्यू पद्धतीने होणार

कोल्हापूर, ता. २३ : मार्च, एप्रिल २०२२ मधील उन्हाळी सत्रातील पदवी स्तरावरील विधी व अभियांत्रिकी अभ्यासक्रमांच्या परीक्षा ऑफलाईन (एमसीक्यू) पद्धतीने घेण्यात येणार आहेत. त्याबाबतचा निर्णय परीक्षा विभागाने आज घेतला.

विधि व अभियांत्रिकी अभ्यासक्रमांचे प्रवेश उशिरा झाल्याने या अभ्यासक्रमांच्या परीक्षा अद्याप सुरू झालेल्या नाहीत. त्याचा विचार करून विद्यापीठ अधिकार मंडळाने या अभ्यासक्रमांच्या परीक्षा ऑफलाईन घेतल्या जाणार आहेत. ५० गुणांची संपूर्ण अभ्यासक्रमावर आधारित (प्रश्नपत्रिकेत एकूण २५ प्रश्न व प्रत्येकी २ गुण) एक तास कालावधीची बहुपर्यायी प्रश्नावली असेल. परीक्षेचे सुधारित वेळापत्रक लवकरच जाहीर करण्यात येईल.

24 JUN 2022 तरुण भारत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# गौरव भोसलेची वेस्ट झोन क्रिकेट स्पर्धेसाठी विद्यापीठ संघात निवड

प्रतिनिधी
आजरा

राजस्थान येथे होणाऱ्या वेस्ट झोन क्रिकेट स्पर्धेसाठी आजरा महाविद्यालयाच्या गौरव भोसले याची शिवाजी विद्यापीठ क्रिकेट संघात निवड झाली आहे. अखिल भारतीय क्रीडा विद्यापीठ असोशिएशन व जे. जे. टी. यू. विद्यापीठाच्यावतीने दिनांक २३ ते २७ जून दरम्यान ही स्पर्धा होणार आहे.



गौरवला संस्थेचे अध्यक्ष अशोक चराटी, डॉ. अनिल देशपांडे, रमेश कुरूणकर, डॉ. दीपक सातोस्कर, योगेश पाटील, दिनेश कुरूणकर, विलास नाईक, विजयकुमार पाटील, सु. ई. डांग, प्राचार्य अशोक सादळे, उपप्राचार्य दिलीप संकपाळ, धनंजय पाटील, अल्बर्ट फर्नांडिस यांचे प्रोत्साहन लाभले.

24 JUN 2022

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# लॉ, अभियांत्रिकीच्या परीक्षा एमसीक्यू पध्दतीने

प्रतिनिधी
कोल्हापूर

राज्यभरातील इतर विद्यापीठप्रमाणे शिवाजी विद्यापीठातील परीक्षा ऑफलाईन एमसीक्यू पध्दतीनें घ्या, या मागणीसाठी बुधवारी हजारो विद्यार्थी रस्त्यावर उतरले होते. यावर कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या अध्यक्षतेखाली गुरूवारी विद्यापीठ अधिकार मंडळाच्या बैठकीत चर्चा करून विद्यापीठातील लॉ आणि अभियांत्रिकीच्या परीक्षा ऑफलाईन एमसीक्यू पध्दतीने प्रत्यक्ष परीक्षा केंद्रावर घेण्याचा निर्णय घेतला आहे, यासंदर्भातील परिपत्रक विद्यापीठाने जाहीर केले. तर दुसरीकडे इतर अभ्यासक्रमाचे विद्यार्थी आमच्याही परीक्षा ऑफलाईन एमसीक्यू पध्दतीने



■ विद्यापीठ अधिकार मंडळाच्या बैठकीत निर्णय

घ्या, या मागणीवर ठाम आहेत.

शिवाजी विद्यापीठाच्या परीक्षा कोरोना कालावधीमध्ये ऑनलाईन पध्दतीने होत होत्या. परंतू कोरोनानंतर परीक्षा ऑफलाईन पध्दतीने घ्याव्या असा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. त्यानुसार विद्यापीठ प्रशासनाने ऑफलाईन पध्दतीने परीक्षा घेण्याचा निर्णय घेतला. परंतू विद्यार्थ्यांनी या निर्णयाला विरोध करीत ऑफलाईन एमसीक्यू पध्दतीने परीक्षा घ्यावी या मागणीसाठी विद्यापीठाच्या मुख्य इमारतीसमोर आंदोलन केले. यावर विद्यार्थी हिताचा निर्णय घेत कुलगुरू डॉ. शिर्के यांनी अधिकार मंडळाशी चर्चा केली. या चर्चेमध्ये दिवसभर उलट–सुलट चर्चा झाली. त्यानंतर उच्च न्यायालयात दाखल करण्यात आलेल्या जनहित याचिकेच्या आधिन राहून आणि विद्यापीठ अधिकार मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार मार्च–एप्रिल २०२२ उन्हाळी सत्रातील विधी व अभियांत्रिकी पदवी स्तरावरील परीक्षा ऑफलाईन एमसीक्यू पध्दतीने घेण्यात येणार आहेत.

विधी व अभियांत्रिकी पदवी स्तरावरील परीक्षा ऑफलाईन पध्दतीने (प्रत्यक्ष परीक्षा केंद्रावर हजर राहून) ५० गुणांची संपूर्ण अभ्यासक्रमावर आधारित (प्रश्नपत्रिकेमध्ये एकूण २५ प्रश्न प्रत्येकी २ गुण), परीक्षेचा वेळ एक तासाचा असून बहुपर्यायी प्रश्नावली (एमसीक्यू) पध्दतीने घेण्यात येणार आहे. यासंदर्भात वेळोवेळी प्राप्त होणाऱ्या शासन निर्देशानुसार कार्यवाही करण्यात यावी. विधी व अभियांत्रिकी पदवी स्तरावरील परीक्षेचे सविस्तर सुधारित वेळापत्रक यथावकाश जाहीर करण्यात येत आहे. या अभ्यासक्रमाच्या परीक्षेसाठी प्रश्नसंचिक, ज्यादाची वेळ, इत्यादी बाबींची मुभा असणार नाही, याची विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी, असे आवाहन विद्यापीठाने परिपत्रकाव्दारे केले आहे.

**विद्यापीठातील इतर विषयांच्या परीक्षाही ऑफलाईन एमसीक्यू पध्दतीने घ्या**

लॉ आणि अभियांत्रिकी विभागाच्या परीक्षा ऑफलाईन एमसीक्यू पध्दतीने घेण्यात येणार आहेत, असे शिवाजी विद्यापीठाने परिपत्रक जाहीर केले. यामुळे इतर विषयांच्या विद्यार्थ्यांमध्ये उलट-सुलट चर्चा सुरू झाली आहे. तसेच इतर विषयांच्या परीक्षाही ऑफलांईन एमसीक्यू पध्दतीने घ्या, अशी मागणीही पुढे येत आहे.